**“शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखडयास,”**
**सन २०२६-२७ मधील निधी वितरणाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - तीक्षेवि-२०२६/प्र.क्र.१३/का.१४४४-अ/ई-१६२३२४६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १३ मे, २०२६

<u>वाचा :</u> १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीक्षेवि-२००९/प्र.क्र.८०/का.१४४४, दि.०८.०३.२०१०
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीक्षेवि-२०१२/प्र.क्र.२४/का.१४४४, दि.१८.०१.२०१६
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीक्षेवि-२०१२/प्र.क्र.२४/का.१४४४, दि.२०.०७.२०१७
४) विभागीय आयुक्त, अमरावती कार्यालयाचे पत्र क्र.विआकाअ/शेतीविआ/भूसंपादन/निधी मा./१३/२०२६, दि.०२.०२.२०२६ रोजीचे पत्र

**<u>प्रस्तावना :</u>**

वाचा क्र.१ येथील शासन निर्णयान्वये “श्री शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखडयातील” रुपये २५०.०० कोटी किंमतीच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. तद्नंतर वाचा क्र. २ येथील शासन निर्णयान्वये रुपये ३६७.०० कोटीच्या आराखडयास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच वाचा क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये रूपये ४२९.५५ कोटीच्या आराखडयास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत भूसंपादनाच्या वाढीव मोबदला प्रकरणी नगर परिषद, शेगाव यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल विविध प्रकरणात मा.उच्च न्यायालयामध्ये ५०% रक्कम १२ आठवड्यामध्ये जमा करणेबाबत जानेवारी, २०२६ रोजी आदेश दिले होते. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी केलेल्या मागणीनुसार “शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत” कामांसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती विभागीय आयुक्त, अमरावती यांनी वाचा क्र. ४ येथील पत्रान्वये केली आहे. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १९,४२,३९,१४९/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

“श्री शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत” कामांकरिता सन २०२६-२७ आर्थिक वर्षांतर्गत रुपये १९,४२,३९,१४९/- इतका निधी (रुपये एकोणीस कोटी बेचाळीस लक्ष एकोणचाळीस हजार एकशे एकोणपन्नास फक्त) या आराखडयाचे संनियंत्रण अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त, अमरावती यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

(रक्कम रुपये)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व उद्दीष्ट | सन २०२६-२७ करीता अर्थसंकल्पित निधी | सन २०२६-२७ मध्ये यापूर्वी वितरीत निधी | विभागीय आयुक्त, अमरावती यांना प्रस्तावित वितरण |
|---|---|---|---|---|
| १. | ५४५२ ०१३१ ५३-मोठी बांधकामे | २१,००,००,०००/- | निरंक | १९,४२,३९,१४९/- |

२. सदरहू खर्च "लेखाशिर्ष मागणी क्र. ओ-१०, मुख्य लेखाशिर्ष ५४५२-पर्यटनावरील भांडवली खर्च, ०१, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१-पर्यटन केंद्रे (००) (०७) शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखडा (कार्यक्रम) (५४५२ ०१३१) ५३-मोठी बांधकामे" या उद्दिष्टाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर प्रयोजनासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च व प्रधान महालेखापाल, मुंबई यांचे कार्यालयाने नोंदविलेला खर्च याचा ताळमेळ घालण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, अमरावती यांनी करावी. तसेच वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासनास तात्काळ सादर करावे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.२२०/२०२६/व्यय-८, दिनांक १६.०४.२०२६ अन्वये प्रदान केलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१३१४५६५३८२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GEETANJALI SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department, 2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.05.13 14:58:56 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर, भा.प्र.से.)**
**शासनाचे सह सचिव**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, अमरावती.

**प्रत,**

१. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
३. जिल्हाधिकारी बुलढाणा.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
५. कार्यासन १४२४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. कार्यासन (व्यय-८,अर्थ-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती (का.१४४४-अ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.